# बालरंजनचा देखणा प्रयोग 'गाणारी मैना' 30-7-1989



गेली अनेक वर्षे बालरंगभूमीवर सातत्याने आणि हौशीने काम करीत आलेली संस्था म्हणजे 'बालरंजन'. बालरंजनने आतापर्यंत बालगोपालांसाठी अनेक बालनाट्ये सादर केलीत. यावर्षी १४ जनला बालरंजन तर्फे 'गाणारी मैना' हे बालनाट्य सादर करण्यात आले. या बालनाट्याचा प्रयोग अत्यंत शिस्तबद्ध रीतीने सादर करण्यात आला. या नाटकाचे लेखक रत्नाकर मतकरी व दिग्दर्शक श्री. संजय पेंडसे होते.

गाणारी मैना हे बालनाट्य अद्भुतरम्य परीकथेवर आधारित आहे. बालनाट्याचा बाल-प्रेक्षकांनी मनमुराद आनंद लुटला. या नाटकात अनेक गाणी होती. सदानंद यांच्या संगीत दिग्दर्शनावर बालप्रेक्षकांच्या टाळ्या पडल्या. गाण्याबरोबरच नृत्येही असल्यामुळे त्यांना एक वेगळीच मेजवानी होती. कामे सर्व कलाकारांनी मन लावून केलीत. विशेषतः नाटकातील आचार्य मकरंद पांडे यांनी छाप मारली. नाटकाला नेपथ्य व प्रकाश योजना अतुला पटवर्धन आणि विलास लखोटे यांनी केले होते. निर्मिती प्रमुख राजेंद्र हरकरे हे होते व निर्मिती-साहाय्य श्रीरंग सप्रे, दीपक तांबोळी, सीमा काळे आणि अपर्णा देशमुख यांनी केले.

नाटकातील कलावंत पुढीलप्रमाणे– सम्राट– जयदीप भालेराव, युवराज– सचिन खर्डेनवीस, मार्जारसेन– स्वप्नील चौधरी, मार्जारिका– रेश्मा कुळकर्णी, मूषकसेन– प्रशांत चेंडके, मूषिका– अंजली डाके, आचार्य– मकरंद पांडे, राजवैद्य– रवींद्र भते, कलिका– गौरी काळे, मृत्यू– अजय तिर्गारिया, पहारेकरी– यशवंत वझे, प्रतिनिधी– शंतनू पाठक.

उत्कृष्ट टीमवर्क ही नाटकाची जमेची बाजू होती. बालरंजनने आपल्या परंपरेला साजेसा नेटका प्रयोग सादर केला.